# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## केस क्रं. ग्रागानिमं/नाशप/०३३ /२०१०

अर्जदार : श्री चंद्रभान सिताराम बारापात्रे
राहणार प्लॉट नं. 299,
ओम नगर,
नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
महाल विभाग, नाशप,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती :
1) श्रीमती मीरा खडक्कार
सभापती,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्रीमती के.के घरत
कार्यकारी अभियंता तथा
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

3) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

— आदेश ——

पारीत दि. २६.०५.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यानी तक्रार अर्ज दिनांक १२.०४.२०१० रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम 6.4 विनियम 2006 प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील :–

तक्रार कर्त्याचे म्हणणे असे आहे की त्याचे घरगुती लाईट मिटर व पिठाची चक्कीकरिता सि.टी. मिटर लावण्यात आले होते. परंतु काहीही कारण नसतांना ईलेक्ट्रीक मिटर बदलविण्यात आले. त्या मिटरची किंमत दुस–या महिन्यापासुन वसुल करण्यात आली. तक्रारकर्त्याचे म्हणने असे आहे की, काहीही कारण नसतांना त्याचे घरातील तीन मिटरची किंमत व एका सि.टी. मिटरची किंमत एकुण १४,०००/– हजार रूपये वसुल करण्यात आले. गैरअर्जदार कंपनीच्या परिपत्रका प्रमाणे मिटरची किंमत वसुल करणे बंद झाले आहे म्हणुन मिटरची किंमत एकुण रक्कम १४,०००/– रूपये परत करण्यात यावी.

गैरअर्जदाराने आपले उत्तर दिनांक २७.०४.२०१० रोजी दाखल केलेले आहे त्यात तक्रार कर्त्याने पिठाच्या चक्कीकरीता व घरगुती वापराकरीता असलेले तीन मिटर कंपनीच्या धोरणानुसार ऑक्टोबर २००४ मध्ये बदलविण्यात आले आहे, याबाबत तक्रारकर्त्याने कोणत्याही प्रकारची जबरदस्ती केलेली नाही.

गैरअर्जदाराने असे म्हटले आहे की महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या आदेशाप्रमाणे ग्राहकाकडुन मिटरची रक्कम वसुल केलेली आहे व ती रक्कम परत देता येणार नाही.

दोन्ही पक्षाचे म्हणणे एकुण घेतले.

गैरअर्जदाराने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग केस नं. २६/२००२ मध्ये दिनांक २८.०६.२००५ रोजी दिलेल्या आदेशाची प्रत व गैरअर्जदार कंपनीचे परिपत्रक क्रंमाक ६४६ व ६६८ ची प्रत दाखल केलेली आहे. विद्युत मिटरची रक्कम ग्राहकाकडुन घेण्याचा संबधात केस क्रंमाक २६/२००२ मध्ये मार्गदर्शक सुचना केलेल्या आहे, तसेच ग्राहका कडुन कोणत्या परिस्थितीत विद्युत मिटरची रक्कम घेता येईल हे ही स्पष्ट केलेले आहे. सदर आदेशाच्या परिच्छेद क्रंमाक 11 मध्ये स्पष्टपणे नमुद केलेले आहे कि, दिनांक १०.०१.२००२ ते १९.०१.२००५ हया कालखंडात ग्राहकाकडुन मिटर

बदलल्यानंतर मिटरची रक्कम वसुल करण्यात यावी, व त्यानंतरच्या काळात काही विशिष्ट परिस्थितीतच ती रक्कम वसुल करता येईल.

सदर तक्रारकर्त्याचे चारही मिटर ऑक्टोबर २००४ व जानेवारी २००४ हयावेळी बदलविण्यात आलेले असल्यामुळे तक्रारकर्त्याकडुन सदर मिटरची किंमत वसुल करणे योग्य आहे. तक्रारकर्त्याची सर्व मिटर महावितरण कंपनीच्या धोरणानुसार बदलविण्यात आलेली आहे व त्याकरीता ग्राहकावर जबरदस्ती झालेली नाही हे स्पष्ट दिसुन येते.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशाप्रमाणे मिटरची किंमत नियमाप्रमाणे असुन वसुल केलेली मिटरची रक्कम ग्राहक परत मागु शकत नाही.

दोन्हीही पक्षांचे म्हणणे सविस्तरपणे एकल्यानंतर तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने पारीत केलेल्या आदेशाचा विचार केल्यावर तक्रार कर्त्याकडुन मिटरची किंमत वसुल करणे नियमाला धरून आहे असे या मंचाचे मत झालेले आहे.

## आदेश

तक्रारकर्त्याची सदर तक्रार खारीज करण्यात येत आहे.

| (श्रीमती के.के. घरत) | (श्रीमती गौरी चंद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
|---|---|---|
| सदस्य – सचिव | सदस्या् | सभापती |